**<u>निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज, वादीने प्रतिवादी यांच्या विरुध्द तूर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-३९-नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

**प्रस्तुत अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

२. वादीने प्रस्तुतचा दावा निंरतर मनाई हुकुम व सरसनिरस मानाने वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने दावा मिळकतीचे वर्णन वादपत्राच्या परिच्छेद क्र.१ मध्ये चतु:सिमेसह दिलेले आहे. (सदर मिळकतीस येथून पुढे सोयीकरीता ''वाद मिळकत'' असे संबोधण्यात येते.)

३. सदर अर्जाद्वारे वादीने असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे नातेवाईक आहेत. मयत हकीम तुकाराम पवार हे वादी आणि प्रतीवादी क्रं. ११ चे वडील होते, प्रतीवादी क्रं. २ ते ९ आणि १२ चे आजोबा तसेच प्रतीवादी क्रं. १,१० व १३ चे सासरे आणि प्रतीवादी क्र.११ चे भाउ होते. शेतजमीन सर्व्हे क्रं.१६१/१, २ हे. ४४ आर, आणि सर्व्हे क्रं.१६१/२ क्षेत्र २.०० हेक्टर ० आर, मौजा अंबाझरी तह.हिंगणा जिल्हा नागपुर ही शेतजमीन वादी आणि प्रतीवादी यांची एकत्र हिंदु कुंटुबाची वडिलोपार्जित मिळकत असुन आजतगायत सदर मिळकतीचे वाटप वादी व प्रतिवादी यांच्यात झालेले नाही. वादीचा वादग्रस्त मिळकतीमध्ये हिस्सा आहे. प्रतिवादीने आजतगायत वादीने वेळोवेळी विंनती करुनही वाटप करुन दिलेले नाही. प्रतिवादी हे वादीचा सदर मिळकतीमधील हिस्सा बळकवाण्यास प्रयत्न करत आहे. सबब सदर अर्जाव्दारे वादीने प्रतिवादीं विरुध्द सदर दावा निकाली होईपर्यत वादमिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तातंरण करु नये यासाठी दाखल केला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी १,७,८,१० हजर झालेत परंतु त्यांनी कैफीयत सादर न केल्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफीयत आदेश पारित करण्यात आला. तसेच प्रतीवादी क्रं. २ ते ६,९, ११ ते १३ यांना समन्सची बजावणी होउन सुध्दा ते हजर न राहिल्याने त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश करण्यात आलेला आहे .

५. वादीचा युक्तिवाद ऐकला. प्रतीवादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर राहिल्याने त्यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला नाही. अर्ज गुणदोषावर निकाली काढणेसाठी हाती घेतला. उपलब्ध कागदपत्रांवरुन तसेच वादपत्रात नमुद केलेल्या कथनावरुन खालील मुद्दे निष्कर्षाकरिता माझे समोर उपस्थित झाले आहेत आणि सदर मुदद्यांची कारणे खालील प्रमाणे नोंदविण्यात आलेले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी अर्ज प्रथमदर्शनी सिध्द करतात काय? | होय. |
| २ | सोयीचा समतोल कोणाच्या बाजूने आहे? | वादीच्या. |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार आहे काय ? | होय. |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिंमासा

**मुद्दा क्र १ ते ४ :-**

६. सदर मुद्दे हे एकमेकास संलग्न असून कारणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी एकत्रितरित्या चर्चित आहे.

७. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ वाद मिळकतीचा ७/१२ उतारे व इतर महत्वपुर्ण कागदपत्रे दाखल केली आहेत. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचा उहापोह आवश्यकता भासल्यास कारणमिमांसे दरम्यान करण्यात येईल.

८. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादीचा वादग्रस्त मिळकतींमध्ये अविभक्त हिस्सा आहे. वादग्रस्त मिळकती हया वादी व प्रतिवादी यांची एकत्रित हिंदु कुटुंबाची वडिलोपार्जित मिळकत आहेत. प्रतिवादी हे सदर मिळकत हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात असल्याने तूर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात यावा अशी विंनती वादीने केली आहे.

९. प्रस्तुत प्रकरणातील वादी व प्रतिवादीं चे नातेसंबंध बघता वादी व प्रतीवादीं हे एकत्र हिंदु कुंटुंबाचे सदस्य आहेत. आज रोजी वादग्रस्त मिळकती हया वादी तसेच प्रतिवादींच्या नावे

असल्याचे कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी दिसून येते, सबब आज रोजी वादी व प्रतिवादींचे नातेसंबंध पाहता वादीचा वादग्रस्त मिळकतीमधील कायदेशीर हिस्सा असल्याचे व त्याचे हितसंबंध गुंतले असल्याचे दिसुन येते. तसेच वादग्रस्त मिळकती हया प्रतिवादींच्या नावे असल्याने सदर अर्ज मंजुर झाल्यास त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचे हक्क व हितसंबंध सदर मिळकतीत गुंतलेले असल्याने सदर अर्ज नामंजूर झाल्यास व दरम्यान वादग्रस्त मिळकत हस्तांतरीत झाल्यास तुलात्नक दृष्टा वादीचे नुकसान होईल.

१०. वर चर्चा केल्याप्रमाणे वादग्रस्त मिळकती हया सदर दावा निकाली होई पर्यंत प्रतिवादी च्या नावे राहिल्यास कोणत्याही पक्षाचे नुकसान होणार नाही. याउलट सदर अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे हक्क व हितसंबंध वादग्रस्त मिळकतीमध्ये गुंतलेले असल्याने निश्चितच त्यांची गैरसोय होईल.

११. वादीने वाद मिळकतीचे ७/१२ उता-यांची प्रत दाखल केली आहे. वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे किंवा नाही तसेच पुराव्याचा समतोल वादीच्या हक्कात आहे व अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल अशी परिस्थिती आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. वर नमुद केल्याप्रमाणे आज रोजी वादीच्या हक्कात तूर्तातुर्त मनाई हुकुम देण्यासाठी प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसुन येते. दुसरी महत्वाची बाब म्हणजे, सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींचे मोठ्या प्रमाणात पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होईल अशी परिस्थिती नाही. वादीच्या मागणीप्रमाणे तूर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यास वादी पात्र आहेत.

१२. वाद मिळकतीचे स्वरुप हे निश्चितच दाव्यातील पुराव्याद्वारे नंतर सिध्द होईल. वादीने दाखल केलेली कागदपत्रे पाहता आज रोजी पुराव्याचा समतोलही त्यांच्या हक्कात दिसुन येतो. सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास तुलनात्मक दृष्टया प्रतिवादींचे नुकसान होत नाही. उलट सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीची गैरसोय होईल.

१३. वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे. सदर अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरिमीत नुकसान होईल अशी परिस्थिती नाही. तसेच सोयीचा समतोलही वादीच्या बाजूने आहे. सदर अर्ज नामंजूर झाल्यास वादीची गैरसोय होईल. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी वादग्रस्त मिळकतींचे इतर कोणाच्याही हक्कात कोणत्याही प्रकारे हस्तातंरण करु नये असा तूर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो.

ठिकाण : हिंगणा

दिनांक : १५.१०.२०२४

( **व्ही. आय. शेख** )

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, हिंगणा